# गर्भाधान (ऋतूशांती]

गर्भाधान म्हणजे योग्य दिवशी, योग्य वेळी, पवित्र व मंगलमय वातावरणात आनंदी मनाने स्त्री-पुरुषांचे मिलन होऊन स्त्री चे गर्भाशयात गर्भाची बीज रुपाने स्थापना होणे. रजोदर्शनापासुन सोळा रात्रींपर्यंत स्त्रियांच्या ऋतुकाळी गर्भसंभव होउ शकतो. या संस्कारासाठी ऋतुदर्शनापासुन पहील्या चार रात्री वर्ज्य कराव्या. समरात्री संभोग केल्यास पुत्र व विषमरात्री संभोग केल्यास कन्या संतति होते, असा समज आहे. अशुभ दिवस, ग्रहणदिवस, कुयोग त्या दिवशी असु नये. या दिवशी स्त्रीला सुशोभीत आसनावर बसवितात, ओवाळुन औक्षण करतात. तिने चांगले दागीने, फुलमाला, (गजरा) इ. परीधान करावे. नंतर, पतीशी मिलन करावे.

सोळा संस्कारांपैकी पहिला संस्कार. शौनकाने त्याची व्याख्या अशी दिली आहे- निषिक्तो यत्प्रयोगेण गर्भः सन्धार्यते स्त्रिया । तद् गर्भालम्बनं नाम कर्म प्रोक्तं मनीषिभिः ।।

ज्या कर्माच्या पूर्तीने स्त्री पतीद्वारा प्रदत्त अशा गर्भाचे धारण करते त्याला विद्वान लोक **"गर्भाधान"** असे म्हणतात.

भगवंताच्या सृष्टीचक्राला गतीमानता देऊन सतत प्रसूतीचे कार्य करून सृष्टीचे कार्य चालू ठेवणारी ही प्रकृती आहे. त्यात मादीच्या स्वरूपाने कार्य ही सृजनशक्तीची देणगी आहे. मानवप्राण्यात स्त्री प्रजानिर्मितीचे कार्य करते. उत्तम प्रजेची निर्मिती आणि तिचे संगोपन होणे आवश्यक आहे. या दृष्टीने सोळा संस्कारांत गर्भाधानाला फार महत्त्व आहे. सुप्रजा सिद्धांताप्रमाणे योग्य गर्भधारणेच्या दृष्टीने गर्भधारणेच्या अगोदर पिंडशुद्धी होणे आवश्यक असते; कारण चांगल्या बीजशक्तीमुळेच चांगली संतती निर्माण होते. संत तुकाराम महाराज म्हणतात,
'शुद्ध बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी ।

## मुहूर्त

हा संस्कार विवाहानंतर प्रथम रजोदर्शन झाल्यापासून (मासिक पाळीच्या पहिल्या दिवसापासून) पहिल्या सोळा रात्री, ज्यास 'ऋतूकाल' म्हणतात, त्या वेळी करतात. त्यांत पहिल्या चार, अकरावी आणि तेरावी रात्र सोडून शेष दहा रात्री या संस्कारास योग्य समजाव्या, कित्येकदा 'चौथा दिवसही घ्यावा', असे म्हणतात, गर्भाधानसंस्कारास चतुर्थी, षष्ठी, अष्टमी, चतुर्दशी, अमावास्या आणि पौर्णिमा या तिथी वर्ज्य कराव्यात. उर्वरित कोणत्याही तिथीस आणि सोमवार, गुरुवार, शुक्रवार या वारी, श्रवण, रोहिणी, हस्त, अनुराधा, स्वाती, रेवती, तिन्ही उत्तरा, शततारका या नक्षत्री उत्तम चंद्रबळ पाहून गर्भाधानविधी करावा. प्रकृतीतील प्रत्येक गोष्ट कालानुसार पालटत (बदलत) असते. केवळ ब्रह्म स्थिर असते. या नियमानुसार स्त्रीबीज फलित होणे, पुत्र किंवा कन्या होणे इत्यादी गोष्टीही काळानुसार पालटत असतात. या नियमानुसार कोणती तिथी, वार आणि नक्षत्र पुत्र किंवा कन्या होण्यास पूरक असते, हे निश्चित केलें गेले आहे.

## विधी

अश्वगंधा किंवा दूर्वा रससेवन पतीने स्त्रीच्या पाठीमागे उभे राहून मंत्र म्हणून तिच्या उजव्या नाकपुडीत अश्वगंधा किंवा दूर्वा यांचा रस पिळावा. तो रस पोटात गेल्यावर स्त्रीने आचमन करावे. उजवी नाकपुडी पिंगळा नाडीची आहे. बहुतेक कार्ये यशस्वी होण्यासाठी पिंगळा नाडी कार्यरत असणे पूरक ठरते. अश्वगंधा किंवा दूर्वा यांच्या रसाने ती नाडी कार्यरत होते.

## प्रजापति पूजन

गर्भाधान आणि विवाह या संस्कारांची प्रमुख देवता प्रजापति आहे. या देवतेच्या प्रतिमेची कलशावर स्थापना करून अष्टदिक्पाल आणि नवग्रहांसहित षोडषोपचारे पूजन करतात.

## ओटी भरणे

सूर्यस्तवन झाल्यावर पाच सुवासिनींनी फळांनी स्त्रीची ओटी भरावी आणि तिच्या पतीच्या हाती विड्याच्या दोन पानांवर ठेवलेला नारळ द्यावा. नंतर स्त्री आणि तिचा पती यांनी देव आणि वडील यांस नमस्कार करून भोजन करावे. सूर्य हे तेज ततृत्त्वाचे प्रतीक आहे. गर्भ तेजस्वी व्हावा, म्हणून सूर्यस्तबन करतात. ओटीपोटातील ओटीत स्त्रीचे गर्भाशय असते. गर्भधारणा व्हावी, म्हणून ओटी भरण्याची पद्धत आहे.

## विधी

रात्री स्त्रीने श्वेतवस्त्र परिधान करावे. निजण्याच्या खोलीतील मखरात पुष्पाची शेज केलेल्या पलंगावर उभयतांनी बसून विडें खावे. गर्भाची वृद्धी सुखपूर्वक होवो आणि दहा (चांद्र) मासांचे पूर्वी तो पतन न होवो, अशी ईश्वर कृपा करो.' 'तुझ्या प्राणात (बीजात) रेत धारण करतो', असे म्हणावे. नंतर मंत्र म्हणावा.

'जशी पृथ्वी ही अग्नीने गर्भवती आहे, जशी याही इंद्राच्या योगाने गर्भवती आहे, जसा वायू हा दिशांचा गर्भ आहे, अशा रीतीने मी तुला गर्भधारणा करवितो. 'शेवटी स्त्रीच्या हृदयास स्पर्श करून आचमन करावे, म्हणजे हा विधी पुरा झाला. हृदयास स्पर्श करणे हे स्नेह आणि प्रेम यांचे प्रतीक आहे. अशुभ काळात रजोदर्शन झाले असता गर्भाधानापूर्वी करावयाची शांती 'रजोदर्शनासाठी अशुभ काळ आला असता मोठा दोष होतो. या दोषनिवारणासाठी 'ऋतूशांती' नावाचा विधी करावा लागतो. (या विधीला 'भुवनेश्वरी शांती' असे म्हणतात.)

अशुभ असणारी नक्षत्रे पुढीलप्रमाणे आहेत - भरणी, कृत्तिका, आर्द्रा, आश्लेषा, मघा, पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, विशाखा आणि ज्येष्ठा.

अशुभ असणारे योग याप्रमाणे - विष्कंभ, गंड, अतीगंड, शूल, व्याघात, वज्र, परीघ, व्यतीपात, वैधृती आणि भद्रा. याचप्रमाणे पुढील कालावधीही अशुभ मानलला आह ग्रहणकाल, मध्यरात्र, संधीकाल, अपराह्णकाल आणि निद्राकाल.

गर्भाधानापूर्वी करावयाच्या शांतीचा संक्षिप्तरूपाने विधी

## असा

प्रथम भुवनेश्वरी शांतीचा संकल्प करावा. श्री गणपतिपूजन, वरुणपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन आणि नांदीश्राद्ध करावे. नंतर पंचगव्यमेलन करून स्थळाची शुद्धी करावी. तीन कलश एका ओळीत ठेवून मध्यभागी असलेल्या कलशावर श्री भुवनेश्वरीदेवी या मुख्य देवतेची प्रतिमा स्थापन करावी आणि तिची षोडषोपचारे पूजा करावी. श्री भुवनेश्वरीदेवीच्या उजव्या अंगाला असलेल्या कलशावर इंद्राणी आणि डाव्या कलशावर इंद्र या देवतांची स्थापना करून त्यांचे पूजन करावे. त्यानंतर यज्ञकुंडात अग्नीची स्थापना करावी. नंतर इंद्राणी देवतेच्या कडेला नवग्रह मंडल स्थापन करून त्यांची पूजा करावी. नंतर यज्ञकुंडाकडे बसून पुढीलप्रमाणे अन्वाधान (आहुत्यांची संख्या निश्चित करणे) करावे. नवग्रहांसाठी अनुक्रमे रूई, पळस, खैर, आघाडा, पिंपळ, औदुंबर, शमी, दूर्वा आणि दर्भ या समिधांनी, तसेच चरु आणि आज्य यांनी २८ वेळा मंत्रांनी हवन करावे. तसेच भुवनेश्वरीसाठी दूर्वा, तीळमिश्रित गहू, पायस आणि तूप यांनी १००८ वेळा मंत्राने हवन करावे. नंतर इंद्र आणि इंद्राणी यांसाठी प्रत्येकी १०८ वेळा हवन करावे. हे शक्य नसल्यास श्री भुवनेश्वरी देवीसाठी १०८ किंवा २८ आणि इंद्र-इंद्राणी यांसाठी २८ किंवा ८ वेळा हवन करावे. या वेळी वापरण्यात येणारे पायस होमावरच बनवलेले असावे; घरात केलेले नसावे. नंतर स्विष्टकृत् इत्यादी होमकर्म करून बलीदान, यजमान अभिषेक, विभूतीग्रहण आणि श्रेयोदान करावे.' गर्भाधान संस्कार प्रत्येक गर्भधारणेत पुन्हा करण्याची आवश्यकता नसते.

## अष्टमांगल्य (आठांगुळे)

ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या त्रैवर्णिकांत हा संस्कार करतात. गर्भाधानसंस्कार न करता गर्भधारणा झाल्यास आठव्या मासात हा लौकिक संस्कार करतात. याचा विधी गर्भाधानाप्रमाणे आहे.

HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com